महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

===========================================================

जावक क्रमांक – ७८७/६९ दिनांक :- २२ मे, २०२५

प्रसिद्धिपत्रक

कोकण मंडळ प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य सदनिका सोडत-२०२४

# शिरढोण, खोणी येथील ०६ हजार २४८ सदनिकांच्या विक्री किंमतीत कपात

मुंबई, दि. २२ मे, २०२५ :- कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे (म्हाडाचा विभागीय घटक) सन २०२४ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटातील सदनिकांसाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर काढण्यात आलेल्या सोडतीतील मौजे शिरढोण (ता. कल्याण, जि. ठाणे) व मौजे खोणी (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील ०६ हजार २४८ सदनिकांची विक्री किंमत कमी करण्यात आली असून पात्र लाभार्थ्यांना या निर्णयामुळे आर्थिक दिलासा मिळणार असल्याची माहिती कोकण मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर यांनी दिली.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा. प्र. से.) यांनी मौजे शिरढोण येथील सदनिकांच्या सुधारित विक्री किंमत प्रस्तावास मान्यता दिली असून सदर मान्यतेनुसार कोकण मंडळाच्या ऑक्टोबर २०२४ मधील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेतील ठाणे जिल्ह्यातील मौजे शिरढोण येथील अत्यल्प उत्पन्न गटातील ५२३६ सदनिकांची विक्री किंमत प्रती सदनिका ०१ लाख ४३ हजार ४०४ रुपयांनी कमी करण्यात आली असून सदर सदनिकेची सुधारित विक्री किंमत आता १९ लाख २८ हजार ७४२ रुपये आकरण्यात येणार आहे, असे श्रीमती गायकर यांनी सांगितले.

तसेच मंडळाच्या ऑक्टोबर २०२४ मधील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावरील मौजे खोणी (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील अत्यल्प उत्पन्न गटातील १०१२ सदनिकांची विक्री किंमत प्रती सदनिका ०१ लाख ०१ हजार ८०० रुपयांनी कमी करण्यात आली असून सदर सदनिकेची सुधारित विक्री किंमत आता १९ लाख ११ हजार ७०० रुपये असणार आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 787/69 Dt. 22 May, 2025

**Press Release**

Konkan Board 'First Come, First Served' Lottery 2024

## Significant Reduction in Sale Prices of 6,248 Flats at Shirgaon and Khoni

Mumbai, May 22, 2025 :- The Konkan Housing and Area Development Board (a regional unit of MHADA) has announced a reduction in the sale prices of 6,248 flats located at Mouje Shirgaon and Mouje Khoni in Kalyan taluka of Thane district, under the "First Come, First Served" scheme for the Economically Weaker Section (EWS) category launched in 2024 under the Pradhan Mantri Awas Yojana (Urban). This move will directly benefit eligible applicants, according to Mrs. Revati Gaikar, Chief Officer of the Konkan Board.

Mr. Sanjeev Jaiswal (I.A.S.), Vice President and Chief Executive Officer of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA), has approved the revised sale price proposal for the flats at Mouje Shirgaon.

As per this approval, the sale price of 5,236 flats under the Economically Weaker Section (EWS) category at Mouje Shirgaon in Thane district—part of the Konkan Board's "First Come, First Serve" scheme for October 2024—has been reduced by ₹1,43,404 per flat. The revised sale price of each flat will now be ₹19,28,742, informed Mrs. Gaikar.

While, the sale price of 1,012 flats at Khoni (Tal. Kalyan) has been reduced by ₹1,01,800 per dwelling unit, bringing the new sale price per flat to ₹19,11,700.

This reduction in pricing will make home ownership more affordable for citizens from the economically weaker sections and is an important step towards inclusive urban development.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---